## आतां विश्वात्मके देवे, येणे वाग्यज्ञे तोषावे,
## तोषोनि मज द्यावे, पसायदान हे ...

संत ज्ञानेश्वर विरचित ज्ञानेश्वरी या ग्रंथातील शेवटच्या १८०२ ते १७९४ ओवी)-(- १८ व्या अध्यायाचे समापन पसायदान या प्रार्थनेने होते. सहा आठवड्या पूर्वीच यशस्वी रित्या आयोजित आपल्या मंडळाच्या व्या अधिवेशनाचे समापन 69 देखील ह्याच पसायदानाने झाले ”अधिवेशन“ .हे एक वर्षाचा कालावधी लोटल्यावर सभासदांच्या पुढे आपण एक वर्ष काय केलं ,हा तपशील सादर करावयाची तर वेळ असतेच पण येणाऱ्या वर्षात आपण मंडळाच्या उन्नति निमित्त काय आखणी केली आहे ,ह्याची देखील कल्पना प्रस्तुत करून त्यास सभासदांची मान्यता आणि स्वीकृती मिळवायची पण वेळ असते. सभासद हो, आपण बडोदा येथे आलात ,संपूर्ण अधिवेशन अवधीत परस्पर संवाद केलात, विविध कार्यक्रमांचा आनंद घेतला, आमचे म्हणणे ऐकिले ,आम्हाला सुसंगत सूचना केल्या आणि आमच्या पाठीवर शाबासकीची थपकी लावली ,ह्या करीता मी आणि समस्त कार्यकारिणी आपण सर्वांचे मनापासून आभारी आहोत. आमचा आणि आयोजक संस्थेचा सतत प्रयत्न होता कि आपण सर्वांना आवश्यक असलेल्या सुविधा वेळशीर उपलब्ध होतील ,तरी पण जर कोणा सभासदास कुठल्याही प्रकारच्या अव्यवस्थेमुळे काही त्रास झाला असेल तर मी आयोजन समितीच्या वतीनं दिलगिरी व्यक्त करतो .

मंडळी, मागील वर्षात ठळक पणे सांगता यावे अशी बरीच महत्वाची कामें ह्या अवधीत पार पडली आहेत. ह्यात घटनेतील नियमावलीचे संशोधन, संस्था संवाद उपक्रमाचा आरंभ, संस्थेच्या देणगीदारांस प्राप्तीकर कलम 80G ची सवलत प्राप्त व्हावी या साठी निर्धारित प्रक्रियेस चालना, आणी मराठी भाषा परीक्षा संबंधी नवीन व्यवस्था हे मुख्य होय. तसंच महिला सक्षमीकरण च्या दृष्टीनं उचललेलं एक महत्वाचे पाउल म्हणजे आता कार्यकारिणीत महिला प्रतिनिधित्व निर्वाचित पद कार्यवाह (महिला) ह्या माध्यमांतून सुनिश्चित झालेलं आहे हे विशेष. ह्या शिवाय सदनिका आरक्षण ऑनलाईन करणे, सभासद संपर्क माहिती सुधार, अन्य शहरातींल मंडळांचे निवासी सुविधेचे आरक्षण, मुखपत्र पुनर्रचना, मराठी भाषा परीक्षा पुनर्रचना, आणि संस्था संलग्नता प्रमाणपत्र वितरण सारख्या अनेक उपक्रमांची आखणी येत्या वर्षा करिता केलेली आहे. ह्याच बरोबर येत्या वर्षा पासून मंडळाची “कलाकार प्रोत्साहन योजना” देखील राबविण्यात येणार आहे ज्याच्या अंतर्गत बृहन्महाराष्ट्रांतील नोंदणी केलेले कलावंतांचा कार्यक्रम संलग्न संस्थांकरिता त्यांचे येथे प्रायोजित केला जाईल. ह्या मुळे जेथे कलाकारांचे उत्साह वर्धन तर होईलच पण संलग्न संस्थांना देखील त्यांच्या उत्सवांत काही मदत होऊ शकेल. ह्या संबंधात प्रधान कार्यवाह सर्व संलग्न संस्थांशी संपर्क करतीलच. मंडळी, जसं पूर्वी उल्लेख केला आहे, मराठी भाषा परीक्षे करीता आपण सहप्रायोजक शोधला आहे या मुळे मराठी भाषेची सेवा जास्त चांगल्या प्रकारे घडेल असा विश्वास वाटतो. ह्या नवीन व्यवस्थेमुळे जिथे बृहन्महाराष्ट्र मंडळावरचा परीक्षा संबंधीचा आर्थिक भार बऱ्या पैकी कमी होईल, तिथेच परीक्षक, केंद्र प्रमुख, स्पर्धक इत्यादी प्रभृतींच्या मानधनांत आणि बक्षीसात देखील वाढ झाली आहे. महाराष्ट्र शासनाचे राज्य मराठी विकास संस्था ह्यांचा सहयोग या पुढे ह्या उपक्रमा निमित्त मंडळास लाभणार आहे.

सभासद हो, आपल्या पैकी खूप जण आपले मुखपत्र मिळत नसल्याची खंत व्यक्त करतात. ह्याचे कारण शोधल्यास असे कळून आले कि आपल्या पैकी बऱ्याच सभासदांचे पत्ते, मोबाईल व दूरध्वनी क्रमांक, आणि ईमेल आय डी मंडळाकडे उपलब्ध सभासद पुस्तिकेत अद्ययावत नाहीयेत तरी आपण कृपया मंडळाच्या अधिकृत इंटरनेट संकेतस्थळास www.bmmindia.org.in वर भेट देउन आपापली माहिती सुधारावी ही विनंती. आपल्या अधिकृत इंटरनेट संकेतस्थळावर **"सभासद माहिती सुधार"** ह्या विकल्पाच्या माध्यमातून तसंच **8989792200** ह्या व्हाट्सप्प नंबर वर समस्त सभासद आपला संदेश कार्यकारिणी पर्यंत प्रेषित करू शकतात. ह्या शिवाय ईमेल हा मध्यम तर आहेच. बिनचूक माहिती असल्यास आम्हाला आपल्याशी जलद संवाद स्थापित करता येईल आणि कालबाह्य झालेल्या पोष्ट गति वर अवलंबून राहावे लागणार नाही. पुष्कळ ठिकाणी मंडळा कडे उपलब्ध पत्ता टपाल वितरण मर्यादेच्या बाहेर आहे. अश्या सभासदांनी आपला दुसरा पत्ता द्यावा ही विनंती आणि तो पर्यंत ईआवृत्ती चा उपयोग करावा ही पण विनंती.

वरील उल्लेखित प्रगती बघितल्यावर आणि त्यावर आपण सभासदांकर्वी समाधान व्यक्त झालेले ऐकून आम्हाला एक विशेष "संतुष्टी"ची अनुभूती होते. बडोदे येथे प्रत्यक्ष संवादात आपण व्यक्त केलेलं समाधान आमच्या प्रयत्नांना प्रेरणा देत राहील. पण ह्या सर्व समाधाना सोबत एक खंत ही वाटते जी व्यक्त केल्या शिवाय राहणे योग्य वाटत नाही. आपल्यातीलच काही सभासद आणि पूर्व पदाधिकारी आमच्या प्रयत्नांवर विरजण टाकायचं सतत प्रयत्न करीत असतात. कार्यकारिणीच्या काही उपक्रमांच्या संदर्भात, नियमां संबंधी अधिकृत माहिती किंवा स्पष्टीकरण न घेताच अपप्रचार आरम्भितात आणि थेट शासकीय विभागांत तक्रार करीत सुटतात. अर्थातच त्या तक्रारींना कायद्याची जोड नसल्याने हे प्रयत्न फसतात. पण आपल्या अपकार्या मुळे आपण संस्थेचे हिताविरुद्ध कार्य तर करीत नाही ना हे भान देखील त्यांना रहात नाही. तरी मी हे आव्हान करीत आहे कि कोणाही सभासदास आमच्या आत्ता पर्यंतच्या कार्याबद्दल नियामांसंबंधी स्पष्टीकरण हवं असल्यास त्यांनी निस्संकोच आमच्याशी अधिकृत पणे पृच्छा करावी. तथापि मी येथे स्पष्ट करू इच्छितो कि कोणी कसं ही वागलं तरी माझा कोणावरच राग नाही. ज्ञानेश्वर माउली म्हणतात "*जे खळांची व्यंकटी सांडो| तया सत्कर्मी रती वाढो || भूता परस्परे जडो | मैत्र जीवांचे ||*" माउलींना स्मरून मी देखील परमेश्वराशी हेच मागणे मागतो कि, "ज्या व्यक्ती खळ (वाईट प्रवृत्तीच्या) आहेत त्यांच्यातील खलत्व (वाईट प्रवृत्ती) तेवढेच जावो(नष्ट होवो)". त्यांची प्रवृत्ती सतप्रवृत्तीत परिवर्तीत होवो आणि सर्वच व्यक्ती सर्वांचे मित्र होवोत! ह्याहून अधिक मी तरी काय मागू.

असो मंडळी ,निकट भविष्यातच आपण सर्व "बृहन्महाराष्ट्र दिन" साजरा करणार आहोत . महाराष्ट्रा बाहेर राहून सुद्धा आपण सर्वच मराठी भाषा प्रेमी महाराष्ट्रीय ,संस्कृती प्रेमी ,सतत आपल्या मायबोली आईच्या समृद्धीची, श्रीमंतीची स्वप्ने पहात असतो अशी स्वप्नेच आपल्याला आपल्या त्या . त्या आपल्या समाईक ध्येयप्राप्तीसाठी .संबंधातील कर्तव्याची वेळोवेळी आठवण करून देत असतात आपण सर्वच सतत यथाशक्ती प्रयत्न करीत राहू व इतरांच्या अशा प्रयत्नांना हातभार लावू ही बृहन्महाराष्ट्र दिन निमित्त आपण सर्वांना खूप खूप शुभेच्छा .

ह्या बृहन्महाराष्ट्र दिनाच्या उत्साहास जोड द्यायला येतोय तो गुढीपाडवा हा सण . उत्तरायणातील वसंतऋतूतील चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षातील प्रतिपदेला शुभसंकल्पाची गुढी उभारायची असते गुढीपाडवा हे संकल्पशक्तीचे .गूढत्व दर्शवते .'आमचे प्रत्येक पाऊल आमच्या समृद्धीकरिता आता पुढेच पडत राहील', असे प्रतिप्रदा सांगते; म्हणून या दिवशी शुभसंकल्प केल्यास,

तो संकल्प आपल्या जीवनाला फलदायी होतो याकरिताच सत्यसंकल्परूपी गुढीची मुहूर्तमेढ . तर .रोवायची असते मंडळी ह्या पर्वणीस साधून आपण ही ,**"संकल्पाची नवी गुढी उभारूया, महाराष्ट्र धर्म जतन करूया"!** असा संकल्प करुयासभासद . हो ,येणारे नवीन वर्ष आपणांस आणि आपल्या संपूर्ण कुटुंबा करिता चैतन्यमय, सुखमय आरोग्यदायक ,आणि समृद्धीदायक असावे हीच माझी शुभेच्छा.

सभासद हो, वरील दोन्ही सणांहून मोठा असा एक सण पण लवकरच येऊ घातला आहे आणि तो म्हणजे सार्वत्रिक निवडणुका. भारतीय राज्यघटनेने या देशातील नागरिकांना निवडणुकीत मतदानाचा एक फार महत्त्वपूर्ण अधिकार प्रदान केला आहेस्त्री ., पुरुष, गरीब, श्रीमंत, उच्च, नीच असा कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता राज्यघटना लिहिणाऱ्या डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी . समानतेचे हे एक फार .प्रत्येकाच्या मताचे समान मूल्य मानलेमहत्त्वाचे सूत्र घटनेद्वारे भारतातील प्रत्येकाला मिळाले आहे, त्याचे भान ठेवणे अत्यंत आवश्यक आहे मतदान हे प्रत्येक नागरिकाचे . राष्ट्रीय कर्तव्य आहे याचे भान आल्याशिवाय जगातील सर्वात मोठी असलेली आपली लोकशाही सुदृढ होणार नाही, हे प्रत्येकाने लक्षात ठेवायला हवे. सशक्त लोकशाही हवी असेल, तर मतदानाशिवाय पर्याय नाही मतदान हा एक मौल्यवान अधिकार .नागरिक सजग असल्याचे ते एक द्योतक असते . .आहे लोकशाही सुदृढ व सक्षम असेल तर देशाच्या विविधांगी विकासाला चालना मिळण्यास, विकासाला गती येण्यास भरीव मदत होते याच दृष्टिकोनातून .या देशाचा नागरिक म्हणून प्रत्येकाने आपला मतदानाचा हक्क प्राधान्याने बजावणे नितांत गरजेचे आहे किंबहुना .मतदानाचा हक्क बजावणे म्हणजे राष्ट्रीय कर्तव्य बजावणे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. तर मंडळी आपण सर्वांना मी आवाहन करीत आहे कि लोकशाहीच्या ह्या यज्ञात आपण आहुती अवश्य अर्पित करा, मतदान करा. आपल्याला योग्य वाटेल त्या पक्षास करा, योग्य वाटेल त्या व्यक्तीस करा पण मतदान अवश्य करा .

कळावे , लोभ असावा

आपलाच

मिलिंद महाजन